केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात कोरोना साथीच्या प्रादूर्भावामुळे राज्यातील शासनाची कामे करणाऱ्या कंत्राटदारांना चालू कंत्राटाबाबत सोसाव्या लागत असलेल्या अडचणींसंदर्भात उपाययोजना व सहाय्य करणे.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन पुरकपत्र क्र. संकीर्ण-१०२०/प्र.क्र.१००/२०२०/व्यय-१२**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०१ डिसेंबर, २०२०

**वाचा -** (१) शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-१०२०/प्र.क्र.१००/२०२०/व्यय-१२, दि. २९ जुलै, २०२०

(२) शासन पुरकपत्र क्र. संकीर्ण-१०२०/प्र.क्र.१००/२०२०/व्यय-१२, दि. १२ ऑक्टोबर, २०२०

(३) Government of India, Ministry of Finance, Department of Expenditure, Office Memorandum No. F.9/4/2020-PPd, Dated-12th November, 2020

**शासन पुरकपत्र :**

केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे राज्यातील शासनची कामे करणाऱ्या कंत्राटदारांना चालू कंत्राटाबाबत सोसाव्या लागत असलेल्या अडचणीसंदर्भात उपाययोजना व सहाय्य करण्याबाबत वित्त विभागाने निर्गमित केलेल्या संदर्भाधीन क्रमांक १ मधील परिच्छेद ४ मध्ये संदर्भाधीन क्र.३ च्या ज्ञापनातील सूचनांन्वये शासनाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सुधारणा करुन ते पुढील प्रमाणे वाचावे ---

४. ज्या कंत्राटांमध्ये (उदाहरणार्थ, बांधा-वापरा-हस्तांतरीत करा, ई.पी.सी. मॉडेल) कामगिरीसाठी अनामत रक्कम ( Performance Security ) बँक हमीच्या स्वरुपात घेण्यात येते, अशाप्रकरणी जिथे सदर रक्कम कंत्राटातील रक्कमेच्या ३% हून अधिक असेल, तेथे ती ३% एवढी मर्यादित करण्यात यावी व उर्वरीत अधिकची हमीची रक्कम ज्या स्वरुपात असेल त्या स्वरुपात कंत्राटदारास, कामाच्या प्रगतीचा विचार न करता विनाशर्त परत करण्यात यावी.

४(अ) याशिवाय ज्या कामांमध्ये अनामत रक्कम अशाप्रकारे ३ % मर्यादीत केली आहे, अशी व अन्य कामे जेथे अनामत रक्कम मुळातच ३% पेक्षा कमी आहे, अशाप्रकरणी ५०% हून अधिक रक्कमेचे पूर्ण झाले असेल तर ज्याप्रमाणात काम पूर्ण झाले आहे त्याच्या ५०% प्रमाणात हमीची रक्कम कंत्राटदारास विनाशर्त परत करण्यात यावी.

(१) उदाहरणादाखल समजा एक काम ज्याची किंमत ५ कोटीहून अधिक आहे व अनामत रक्कम ५% आहे व काम ६०% पूर्ण झाले आहे अशाप्रकरणी कंत्राटदारास खालील प्रमाणे सवलती प्राप्त होतील.

I. अनामत रकमेत कपात - २% ( वरील ४ प्रमाणे )

II. ३% अनामत रकमेतून ६०% काम पूर्ण झाल्यामुळे = (३% × ६०%/२)=०.९% ( वरील ४ अ प्रमाणे) अशाप्रकारे एकूण ५ % पैकी २.९% एवढी अनामत रक्कम कंत्राटदारास परत करण्यात येईल व २.१% एवढी अनामत रक्कम ठेवून घेण्यात येईल.

(२) समजा एक काम ज्याची किमंत रु. ५ कोटी आहे व ज्यासाठी अनामत रक्कम ५% एवढी घेण्यात आली आहे व काम ४०% पूर्ण झाले आहे, त्याप्रकरणी

I. अनामत रकमेत कपात ५% - ३%= २%

II. मात्र काम ५०% हून कमी झाले असल्याने वरील ४ (अ) नुसार काहीही सवलत मिळणार नाही म्हणून एकूण सवलत ५% अनामत रकमेपैकी २% परत करण्यात यावी.)

४(ब) वरील सुविधा ज्या प्रकरणी दि.१५ मार्च, २०२० पूर्वी निविदा शर्तींचा अन्यथा भंग झाला नसेल, अशा रु.५०० लक्ष पेक्षा अधिक रकमेच्या कंत्राटांना लागू राहतील.

सदर शासन पुरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्यांचा संगणक सांकेतांक २०२०१२०११७४४३८४७०५ असा आहे. हे पुरकपत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIVEK RAMBHAJI DAHIPHALE

Digitally signed by VIVEK RAMBHAJI DAHIPHALE
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=FINANCE DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=56142975484e58364afe88f5f0e3138e3ce0d4e4058e42f003dfd69500064afb, serialNumber=3981a50612646983d580dea2da5fb52a33d8e6e3c4f34cd80f08c598711ceb65, cn=VIVEK RAMBHAJI DAHIPHALE
Date: 2020.12.01 17:47:24 +05'30'

**( वि. रं. दहिफळे )**
**सह सचिव (व्यय), वित्त विभाग**

**प्रत,**

०१.मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
०२. सर्व सन्माननीय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.
०३. राज्यपालांचे सचिव
०४. मुख्यमंत्र्यांचे सचिव
०५. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
०६. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
०७. मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख
०८.प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
०९. प्रधान महालेखापाल (लेखी परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई
१०. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, नागपूर
११. महालेखापाल (लेखापरिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र नागपूर
१३.आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२
१४.आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन, नागपूर ४४४००१
१५.प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१६.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई
१७. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१८. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१९. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
२०. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२१. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदर, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली
२२. सर्व विभागीय आयुक्त
२३. सर्व जिल्हाधिकारी
२४.सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

२५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२७. महासंचालक, लेखा व कोषागारे, कोकण/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती
२८.संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण भवन, नवी मुंबई
२९. सह संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती
३०.वित्त विभागातील सर्व कार्यासने
३१.निवड नस्ती व्यय-१२.